अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– ०३.०१.२०२३

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०१/२०२३ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम -१९८८ |
| आरोपी आलोसे | आशिष प्रकाश भरे, उप अभियंता (वर्ग-१)<br>नेमणूक - झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा कार्यालय, बांद्रा (पुर्व) मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये २,००,०००/- |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १,५०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | फिर्यादी यांचा बांधकाम कॉन्ट्रक्टचा व्यवसाय असून त्यांनी खासदार फंडातून कुर्ला, वाकोला, भारतनगर परिसरात लादी बसविणे, गटार लाईन व इतर डागडुजीची कामे केली आहेत. सदर कामाच्या बिलाची रक्कम मंजूरीकरीता फिर्यादी यांनी झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा कार्यालय, बांद्रा येथे सादर केली होती. नमूद प्रलंबित बिलाबाबत फिर्यादी यांनी म्हाडा कार्यालयात दिनांक १९/१२/२०२२ ते २१/१२/२०२२ या कालावधीत आलोसे यांची भेट घेतली असता, आलोसे यांनी नमूद बिल मंजूर करावयाचे असल्यास रू. २,००,०००/- द्यावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दिनांक २३/१२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष हजर राहून लेखी तक्रार अर्ज दिला.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३/१२/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे थकीत बिल मंजूर करण्याकरीता बिल मंजूरीपुर्वी रू. १,५०,०००/-व मंजूरीनंतर रू. ५०,०००/- असे एकूण रू. २,००,०००/- च्या लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून दिनांक ०३/०१/२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना रू. १,५०,०००/- लाचेची रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून नमूद आरोपीत आलोसे विरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**

०३/०१/२०२३

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अथवा लाच मागणाऱ्या आलोसेबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in,
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB
ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net